CIN No. : L99999MH1975PLC018080

HARIYANA METALS LIMITED

■ OFFICE : Old Motor Stand, Itwari, NAGPUR - 440 008. Tel. 2768743 - 49
■ Fax : 0712-2760463
■ WORKS : 145, Small Factory Area, Bagadganj, NAGPUR - 440 008. Tel. : 2766301, 2778364
■ Fax : 0712 - 2730303 ■ E-mail ID : hariyanametals@gmail.com ■ Website : www.hariyanametals.com

Date: 8th July, 2020

To,
The Listing Compliance
BSE Ltd.
Phiroze Jeejeebhoy Towers
Dalal Street
Mumbai- 400001

Scrip Code: 506024

Dear Sir/Madam,

Sub: - Newspaper Advertisement

We inform your good self that the Audited Financial Results for the quarter and year ended on March 31, 2020 required under Regulation 47 of SEBI (LODR) Regulation, 2015 have been published in "The Financial Express" and "Mahasagar" on 8th July, 2020. The copy of publication of the same are enclosed herewith for your record.

Please take the same on record and oblige

Thanking you.

Yours faithfully

FOR, **HARIYANA METALS LTD**

MR. DINESH AGARWAL
DIRECTOR
DIN: 00291086

HARIYANA METALS LIMITED
NAGPUR

BP to invest $70 m in India's Green Growth Equity Fund

PRESS TRUST OF INDIA
New Delhi, July 7

THE UK-BASED BP on Tuesday said it will invest $70 million in the Green Growth Equity Fund (GGEF) that supports the growing renewable energy sector in India.

The fund, established in 2018, is focused on identifying, investing and supporting growth in zero-carbon and low-carbon energy solutions in the country.

"With a commitment of $70 million, BP will, upon investment later this year, become a limited partner in GGEF and have representation on its advisory committee, as well as the rights to co-invest in projects alongside GGEF," the company said in a statement.

GGEF already includes investments from the Government of India, through the National Investment and Infrastructure Fund (NIIF), and the UK government, through the Department for International Development (DFID).

It expects to reach about $700 million commitment at the final close and grow further through

leveraged capital options.

Dev Sanyal, BP Group's executive vice-president for gas and low-carbon energy, said: "India is committed to the energy transition and pursuing a range of low-carbon options for the future. BP is equally committed to re-imagining energy in India."

He said BP's investment in GGEF was aligned with the group's strategy of investing in integrated low-carbon energy using innovative partnerships and business models.

"It provides a unique platform for BP to accelerate its ambition in India and to co-invest in a variety of zero- and low-carbon energy solutions in the country," he said.

Earlier this year, BP announced its ambition to become a net-zero company by 2050 or sooner. As part of this, one of its 10 aims is to increase the proportion of investments into non-oil and gas businesses.

Sashi Mukundan, president of BP India and and senior vice-president of BP Group, said, "Our investment in GGEF will aim to rapidly scale up commercially viable low-carbon solutions."

"The portfolio and scale of investments made by GGEF — be it in solar power, mobility solutions, or sustainable infrastructure management — is extraordinary. Each one of these will help India achieve its climate goals," he said.

GGEF is managed by EverSource Capital, a joint venture between Lightsource BP and Everstone Capital, and has invested in businesses like Ayana Renewable Power, Radiance Renewables, GreenCell Mobility, and EverEnviro.

Dhanpal Jhaveri, chief executive officer of EverSource Capital and vice-chairman of Everstone Group, said, "Eversource is committed to investing in India's rapidly scaling green sector and providing renewable energy solutions in the country."

Edible oil imports in June at 8-month high

THE COUNTRY'S EDIBLE oil imports rose by 8% to an eight-month high of 11.62 lakh tonne in June but palm oil shipments showed a sharp decline, trade body SEA said on Tuesday. India, the world's leading vegetable oil buyer, had imported 10.71 lakh tonne of edible oils in the same month last year. —PTI

Global body of rubber producers sees demand bounceback in Q3

FE BUREAU
Thiruvananthapuram, July 7

DEMAND FOR NATURAL Rubber (NR) is "set to enter positive territory" after the Covid shock, increasing 1.4% year-on-year during the third quarter of the current fiscal, said ANRPC (Association of Natural Rubber Producing Countries).

"Worst is almost over" (for NR), observes the Kuala lumpur-based global outfit.

Demand levels have "almost returned to normal with the exception of a few countries."

"In particular, consumption in China is expected to increase by 0.8% year-on-year during the three months to the end of September," said RB Premadasa, secretary general, ANRPC, in the latest monthly bulletin "NR Trends Statistics" (June 2020). The world NR consumption had dropped by 15.7% to 5.85 million tonne in the first half 2020. This is partly due to 20% decline in demand from China, which accounts for 40% of total global consumption.

On the production side, the ANRPC report pointed out that Covid-19 was to be blamed for the loss of nearly one million tonne potential NR supply across the globe. Over the first six months of the year, the global NR production had fallen 6.5% year-on-year to 5.70 million tonne.

UP sugar millers allege bias in sales quota allocation

DEEPA JAINANI
Lucknow, July 7

AN ALL-TIME high sugar production of 126 lakh tonne — which is 45% of the country's total output — should have been a badge of honour for Uttar Pradesh sugar mills. But having saddled with the record arrears of cane dues to the tune of ₹14,000 crore, the mills are in an unenviable position.

Moreover, they are not able to liquidate their excessive stock to clear the dues, for which they blame the central government's discriminatory sales quota policy. The mills have repeatedly apprised the state as well as the Centre regarding the quota for sale of sugar not being in sync with its production.

In a letter to the state government recently, the UP Millers Association has alleged inequity and pointed out that UP has produced 126 lakh tonne sugar as against Maharashtra's 61.6 lakh tonne.

"It becomes obvious that sugar sales quota of UP should be double of Maharashtra, keeping in view the higher stock availability in UP," it said, adding that this has not been adhered to by the department of food and public distribution, thereby causing serious problems towards cane price obligations as well as storage of sugar.

Making a comparison, the letter stated that while in 2018-19 season Maharashtra was allocated a quota of 102.18 lakh tonne against the production of 107.20 lakh tonne, UP was allocated a quota of 98.94 lakh tonne against the production of 118.22 lakh tonne in the same year.

महापौर संदीप जोशी यांचा पुढाकार : अग्रवाल स्टडी सेंटर आणि कॅलिबर्स नोव्हा संस्थेने उचलले महत्वपूर्ण पाउल

मनपाच्या ६० विद्यार्थ्यांना शहरातील खासगी कोचिंग क्लासेस देणार जेईई आणि नीटचे धडे

नागपूर ता. ७ : कोव्हिडच्या संकटाने अनेकांचे हाल झाले आहेत. मात्र या संकटात नागरिकांच्या सेवेसाठी अनेक संस्थांनी पुढाकार घेउन माणुसकीची प्रचिती दिली आहे. आता शिक्षण क्षेत्रातही नागपूरकर संस्थांनी सहकार्याचे मोठे पाउल उचलले आहे. नागपूर महानगरपालिकेच्या शाळांमध्ये शिक्षण घेणा-या६० विद्यार्थ्यांना वाणिज्य शाखेसह जेईई आणि नीटचे नि:शुल्क धडे देण्यासाठी शहरातील दोन कोचिंग क्लासेस पुढे आले आहेत. महापौर संदीप जोशी यांच्या पुढाकारातून अग्रवाल स्टडी सेंटर आणि कॅलिबर्स

नोव्हा या संस्थांनी या विद्यार्थ्यांच्या कोचिंगची जबाबदारी उचलली आहे. समाजातील अनेक प्रतिभावंत विद्यार्थी योग्य संधी आणि मार्गदर्शनाअभावी मागे राहतात. त्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे यासाठी अग्रवाल स्टडी सेंटर आणि कॅलिबर्स नोव्हा या कोचिंग क्लासेसद्वारे संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. मनपाच्या शाळांमध्ये शिकणारे अनेक प्रतिभावंत विद्यार्थी परिस्थिती अभावी पुढे जाउ शकत नाही. अशा विद्यार्थ्यांमधील प्रतिभा हेरून त्यांना योग्य मार्गदर्शन देउन त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहामध्ये इतर विद्यार्थ्यांशी बरोबरीने शिक्षण घेण्याचे बळ दिले जाणार आहे.

यावर्षी दहावीची परीक्षा देणा-या विद्यार्थ्यांपैकी सर्वोत्तम ६०विद्यार्थ्यांची दोन्ही संस्थांद्वारे निवड केली जाणार आहे. यामधील विज्ञान शाखेतील ३० विद्यार्थ्यांना जेईई आणि नीटचे तर ३० विद्यार्थ्यांना वाणिज्य शाखेचे धडे दिले जातील. यासाठी दोन्ही संस्था मनपाच्या प्रत्येकी १०० अशा एकूण २०० विद्यार्थ्यांची चाचणी घेणार आहेत. यामधून सर्वोत्तम ३०-३० असे एकूण ६० विद्यार्थ्यांची विज्ञान आणि वाणिज्य शाखेसाठी निवड केली जाणार आहे.

नागपूर महानगरपालिकेच्या शाळांमध्ये शिक्षण घेणारे अनेक प्रतिभावान विद्यार्थी आहेत. या विद्यार्थ्यांनाही त्यांच्या आवडीचे करिअर निवडण्याचा आणि त्यासाठी आवश्यक ते शिक्षण घेण्याचा इतर विद्यार्थ्यांप्रमाणेच अधिकार आहे. मात्र त्यांच्या यशाच्या आड परिस्थिती येत असते. ही बाब लक्षात घेउन महापौर संदीप जोशी यांनी या विद्यार्थ्यांनाही दर्जेदार शिक्षण मिळवून देण्याची संकल्पना मांडली. त्यांच्या या संकल्पनेला साकार करण्यासाठी शहरातील दोन कोचिंग संस्थांनी सहकार्य दर्शविले आहे. मनपाच्या विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी पुढे आलेल्या अग्रवाल स्टडी सेंटर आणि कॅलिबर्स नोव्हा संस्थेचे या पुढाकाराबद्दल महापौरांनी संस्थेचे पंकज अग्रवाल, जगदीश अग्रवाल, प्रिती अग्रवाल आणि राहुल राय यांचे आभार मानले आहे.

दुग्ध सहकारी संस्थेच्या सभासदाकरिता किसान क्रेडीट कार्ड विशेष मोहीम

नागपूर, दि.७ : शेती पीक कर्जा प्रमाणेच अल्प व्याजदरात दुध उत्पादक सहकारी संस्थांच्या सभासदास कर्ज देण्याची योजना कार्यान्वीत केली आहे. जिल्हयात मोठ्या प्रमाणात सहकारी दुध संस्था असून त्यात दुध उत्पादक सभासद आहेत. शेती कर्ज ज्याप्रमाणे ७ टक्के व्याज दराने अल्प काळासाठी मिळते त्याचप्रमाणे हे कर्ज एक वर्षाच्या आत परतफेड केली तर ३ टक्के व्याज दराची कपात करण्यात येते. सभासदाचा दुग्धव्यवसाय लक्षात घेवून बँक या योजनेत कर्ज मर्यादा ठरवून देते. या योजनेत १.६ लाखापर्यंत कर्ज सभासदाकडील पशुधनावर मिळणार आहे.

ज्या दुग्ध सहकारी संस्थेच्या सभासदांना किसान क्रेडीट कार्ड (केसीसी) योजनेचा लाभ घ्यावयाचा आहे. त्यांनी त्यांच्या गावातील दुग्ध सहकारी संस्थेच्या अध्यक्ष व सचिवाशी संपर्क साधून अर्ज भरुन द्यावेत. प्राप्त सर्व अर्ज जिल्हा दुग्ध संघामार्फत बँकेत सादर करण्यात येतील. या बाबतीत काही अडचणी असल्यास नागपूर, भंडारा व गोंदिया जिल्हयाचे जिल्हा दुग्ध विकास अधिकारी, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (दुग्ध), जिल्हा दुध सहकारी संघ यांचेशी संपर्क साधावा. जास्तीत जास्त दुग्ध सहकारी संस्थेच्या सभासदांनी किसान क्रेडीट कार्ड (केसीसी) योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहकारी संस्था (दुग्ध) नागपूर, भंडारा व गोंदियाचे सहाय्यक निबंधक एस.के. कोल्हे यांनी केले आहे.

क्राईम डायरी

प्रकृती खालावून दोघांचा मृत्यू

नागपूर. वेगवेगळ्या घटनांमध्ये प्रकृती खालावल्याने दोघांचा मृत्यू झाला. पहिल्या घटनेत कळमना हद्दीत भरतनगर निवासी दिनेश भुरलाल राजपांडे (३४) यांची सोमवारी दुपारी १२ वाजताच्या सुमारास प्रकृती खालावली. कुटुंबीयांनी त्यांना उपचारार्थ मेयो रुग्णालयात भरती केले, मात्र उपचारादरम्यान सायंकाळी ४.३० वाजताच्या सुमारास त्यांचा मृत्यू झाला. दुसऱ्या घटनेत इमामवाडा ठाण्यांतर्गत एका तरुण मजुराचा प्रकृती खालावल्याने मृत्यू झाला. मृतक नगरधन, आमलापुरी, रामटेक निवासी अन्ना रेड्डी (२५) आहे. मिळालेल्या माहितीनुसार, इमामवाडा हद्दीत बारासिंगा, बोरकरनगर येथे राहणारे रवी सुकलाल तांबे यांच्या घराचे बांधकाम सुरू आहे. या ठिकाणी अन्ना मजुरीचे काम करीत होता आणि तेथेच राहत होता. सोमवारी रात्री अचानक अन्नाची प्रकृती खालावली. त्याला उपचारार्थ मेडिकल रुग्णालयात भरती करण्यात आले. उपचारादरम्यान रात्री १०.१० वाजताच्या सुमारास त्याचा मृत्यू झाला. दोन्ही प्रकरणात मिळालेल्या सूचनेवरून संबंधित ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

पुस्तके विक्रीच्या नावावर चुना

नागपूर. पुस्तकांची विक्री करण्याच्या नावावर एका तरुणीला १.४३ लाख रुपयांचा चुना लावण्यात आला. या प्रकरणी अजनी पोलिसांनी २५ वर्षीय पीडितेच्या तक्रारीवरून मँचेस्टरच्या इसाबेला लुसी आणि बनावट कस्टम अधिकारी प्रिया शर्मा विरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

पीडित तरुणी वैद्यकीय क्षेत्राचे शिक्षण घेत आहे. तिला काही विदेशी प्रकाशनांच्या पुस्तकांची आवश्यकता होती. अशात सोशल मीडियाच्या माध्यमातून तिचा इसाबेलाशी परिचय झाला. तिने स्वस्त किंमतीत पुस्तके पाठविण्याचे आश्वासन दिले. काही दिवसांनी पुस्तके भारतात आली, मात्र कस्टम विभागाने पुस्तके जप्त केल्याची माहिती पीडितेला देण्यात आली. कस्टम ड्युटी आणि इतर शुल्क भरण्यासाठी इसाबेलाने पीडितेला दिल्लीच्या पंजाब नॅशनल बँकेचा खातेक्रमांक दिला. पीडितेने इंटरनेट बँकिंगद्वारे खात्यात १.४३ लाख रुपये पाठविले. हे खाते आसिफ खान नावाच्या व्यक्तीचे होते. पैसे मिळाल्यानंतर आरोपींनी आपले फोन बंद केले. पीडितेला ना पुस्तके मिळाली आणि ना पैसे परत मिळाले. फसवणूक झाल्याचे समजल्यानंतर अजनी पोलिसात तक्रार दाखल केली. पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

कार विक्रीच्या नावावर फसवणूक

नागपूर. कार विक्रीच्या नावावर एका युवकाची २९,१४९ रुपयांची फसवणूक करण्यात आली. या प्रकरणी नंदनवन पोलिसांनी ३० वर्षीय पीडित युवकाच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. पीडित युवकाला सेकंड हॅण्ड कार खरेदी करायची होती. सोशल मीडियावर एमएच-३१/एफए-६०९६क्रमांकाची कार विक्रीसाठी असल्याची जाहिरात त्याला दिसली. युवकाने दिलेल्या नंबरवर संपर्क केला. १.४० लाख रुपयांमध्ये सौदा निश्चित झाला. आरोपीने वाहनाची डिलिव्हरी देण्यापूर्वी २९,१४९ रुपये अडवांस म्हणून देण्यास सांगितले. पीडित युवकाने सांगितलेल्या पेटीएम खात्यात पैसे स्थानांतरित केले. यानंतर आरोपीने संपर्क तोडला. ना कार मिळाली आणि ना पैसे परत मिळाले. पीडित युवकाने नंदनवन पोलिसात तक्रार दाखल केली. पोलिसांनी फसवणूक आणि आयटी ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

१ लाख रुपयांचे केबल चोरी

नागपूर. धंतोली परिसरातून अज्ञात आरोपींनी १ लाख रुपये किंमतीचे केबल चोरून नेले. या प्रकरणी पोलिसांनी छत्रपतीनगर निवासी गौरव संजय पांडे (२८) च्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

गौरव पॉलीकॅब कंपनीत साईट इंजिनिअर आहे. धंतोली परिसरात त्याच्या कंपनीचे केबल वायर टाकण्याचे काम सुरू होते. यासाठी धंतोलीच्या चितळे मार्गावर रविराज रेसीडेन्सीसमोर मोकळ्या जागेत केबलचा बंडल ठेवण्यात आला होता. २५ जूनला रात्री अज्ञात आरोपींनी केबलचे हे बंडल चोरून नेले. दुसऱ्या दिवशी गौरवला साईटवरून केबल चोरी झाल्याचे समजले. त्याने धंतोली ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी चोरीचा गुन्हा नोंदवून परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज पाहून चोरांचा शोध घेण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.

फ्लॅट विक्रीच्या नावावर व्यापाऱ्याला गंडा

नागपूर. फ्लॅट विक्रीच्या नावावर बिल्डर बंधूंनी एका व्यापाऱ्याची फसवणूक केली. मनपा आणि नासुप्रची परवानगी न घेता फ्लॅट स्कीम सुरू केली आणि व्यापाऱ्याकडून १४ लाख रुपये घेतले. या प्रकरणी पोलिसांनी के.के. नगर, जरीपटका निवासी सचिन सुरेश काचेला (२५) च्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. आरोपींमध्ये त्रिमूर्तिनगर, उज्ज्वल सोसायटी निवासी राजू श्रीकृष्णराव साउरकर आणि सतीश श्रीकृष्णराव साउरकर यांचा समावेश आहे.

सचिनचे इतवारीमध्ये ईलेक्ट्रॉनिक्सचे दुकान आहे. २०१६ मध्ये त्याची ओळख साउरकर बंधूंशी झाली. दोघांनीही बिल्डर असल्याची बतावणी करीत सोमलवाडा परिसरात संत तुकडोजी सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या माध्यमातून अन्नपूर्णा ४ नावाने अपार्टमेंट तयार करण्याची माहिती दिली. सचिनही फ्लॅट खरेदी करण्यास इच्छुक होता. आरोपींनी त्याला अपार्टमेंटमध्ये ४०१ क्रमांकाचा फ्लॅट विक्रिसाठी उपलब्ध असल्याचे सांगितले. करारनामाकरून रोख आणि धनादेशाच्या माध्यमातून १४ लाख रुपये घेतले. काही दिवसांनी सचिनला माहिती मिळाली की, आरोपींनी नासुप्र आणि मनपाची परवानगी न घेता फ्लॅट स्कीम बनवून विक्री केली. सचिनने जरीपटका पोलिसात तक्रार केली. पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

आरक्षित जमिनीवर स्कीमच्या नावाने २ कोटींचा गंडा

बिल्डर विजय डांगरेवर आणखी एक गुन्हा दाखल

नागपूर. महाराजा बिल्डरचा संचालक विजय तुळशीराम डांगरे विरुद्ध हुडकेश्वर ठाण्यात फसवणुकीचे आणखी एक प्रकरण नोंदविण्यात आले. यापूर्वीही डांगरेवर गुन्हे नोंद झाले आहेत. हे प्रकरण आरक्षित जमिनीवर बंगलो स्कीम बनवून लोकांकडून पैसे घेण्याचे आहे. सध्या ४ लोकांनी पोलिसात तक्रार करून डांगरेवर २ कोटी रुपयांच्या फसवणुकीचा आरोप लावला आहे. जयंती मॅंशन ७, बेलतरोडी निवासी हीरा श्रावण दलाल (६६) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, १९९५ मध्ये डांगरेने मौजा चिखली खुर्द येथील २.८९ एकर जमिनीवर आपली स्वराज्य पार्क बंगलो स्कीम बनविण्याचे काम सुरू केले. ग्राहकांना स्वस्त किंमतीत बंगलो उपलब्ध करण्याचे आश्वासन देण्यात आले. ६४ बंगल्यांच्या या स्कीममध्ये हीरा यांनीही एक बंगला बुक केला. त्यांच्याप्रमाणेच प्रदीप निळकंठ खोडे, राजीश ज्ञानेश्वर मेघरे आणि रमेश नागोराव पिसे यांनीही बंगलो बुक केला होता. चारही ग्राहकांकडून २ कोटी ४ लाख रुपये घेण्यात आले. अनेक दिवस लोटूनही बांधकाम रखडून होते. काम पूर्ण झाल्यानंतर रजिस्ट्री करून देण्याची बतावणी डांगरेने ग्राहकांना केली, मात्र २ दशक उलटूनही स्कीम पूर्ण केली नाही. अखेर ग्राहकांनी चौकशी सुरू केली. शासकीय कागदपत्रांवरून समजले की, ज्या जमिनीवर डांगरेने स्कीम बनविण्याची योजना दाखविली होती ती जमीन डम्पिंग यार्डसाठी आरक्षित होती. त्या जमिनीवर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येऊ शकत नाही. सामान्यता अशा प्रकरणात बिल्डर सर्वप्रथम जमीन सरकारच्या योजनांमधून मुक्त करून घेतात. मात्र डांगरेने कोणतीही परवानगी न घेता येथे आपली स्कीम सुरू केली. नासुप्रकडूनही कोणत्याही प्रकारची मंजुरी घेण्यात आली नाही आणि काम सुरू करण्यात आले. अखेर नंतर काम थांबवावे लागले, मात्र तोपर्यंत ग्राहकांकडून बुकिंगच्या नावावर मोठी रक्कम वसूलण्यात आली होती. ग्राहकांनी मिळून डांगरेला आपले पैसे परत मागितले असता जीवे मारण्याची धमकी दिली. अखेर पीडितांनी प्रकरणाची तक्रार पोलिसात केली. हुडकेश्वर पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

आईला धमकी देऊन प्रेयसीचे अपहरण

* डेरिंगबाज प्रियकरावर गुन्हा दाखल : प्रेयसी दहावीची विद्यार्थिनी

नागपूर. प्रेयसीच्या आईला धमकी देऊन प्रेयसीचे भर चौकातून अपहरण करण्यात आले. या प्रकरणी मुलीच्या आईच्या तक्रारीवरून डेरिंगबाज प्रियकरा विरूद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला. ही घटना सोमवारी सायंकाळी इसासनी रोडवर घडली. बाका उर्फ आकाश सहारे (वय २२, रा. इसासनी) असे आरोपी प्रियकराचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी बाका सहारे हा गुन्हेगारी प्रवृत्तीचा आहे. तो शातीर घरफोड्या असून त्याच्यावर एमआयडीसी पोलिस ठाण्यात घरफोडी, चोरीचे गुन्हे दाखल आहेत. त्याची गुन्हेगारी पार्श्वभूमी पाहता त्याचा वस्तीत दबदबा आहे. तसेच तो गुन्हेगारी प्रवृत्तीच्या युवकांची टोळी बनवून राहत असल्यामुळे त्याच्याविरूद्ध बोलायला कुणाची हिम्मत होत नाही. गेल्या काही दिवसांपासून तो वस्तीत राहणारी १६ वर्षीय युवती स्विटी (बदललेले नाव) हिच्या पाठीमागे लागला होता. स्विटी ही मूळची उत्तरप्रदेशची असून तिची आई चौकात फळविक्रीचा व्यवसाय करते. तिला लहान भाऊ असून वडीलांचे निधन झाले आहे. स्विटीच्या कौटुंबिक परिस्थितीचा फायदा घेऊन बाका सहारेने तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. आईची प्रकृती खराब असताना स्विटी फळविक्री करीत होती. दरम्यान बाका तिच्या दुकानावर खूप वेळपर्यंत बसत होता. तिला फळविक्री करताना मदत करणे किंवा तिची अन्य युवकांकडून छेडखाणी करण्यापासून बचाव करण्यासाठी मदत करीत होता. त्यामुळे स्विटी बाकाकडे आकर्षित झाली. गेल्या काही दिवसांपासून दोघांच्या एकमेकांची भेटी वाढल्या होत्या. बाकाने स्विटीला मोबाईल गिफ्ट दिला. तेव्हापासून दोघेही एकमेकांच्या प्रेमात पडले. दोघांच्या नियमित भेटी होऊ लागल्या. बाका आणि स्विटीच्या प्रेमप्रकरणाची चर्चा वस्तीत गाजली. त्यामुळे स्विटीच्या आईने तिच्यावर आरडाओरड करीत मामाच्या गावी नेऊन घालण्याची धमकी दिली. त्यामुळे स्विटी घाबरली. सोमवारी दुपारी चार वाजताच्या सुमारास बाका हा स्विटीच्या आईच्या दुकानावर आला. स्विटी ही माझी होणारी बायको आहे...त्यामुळे तुमचा तिच्यावर काहीही हक्क नाही...' असे म्हणत तिच्या आईला धमकी दिली. तसेच दुकानातूनच स्विटीचा हात पकडून तिला पळवून नेले. दुसरीकडे स्विटीच्या आईने थेट एमआयडीसी पोलिस स्टेशन गाठले. मुलीचे अपहरण केल्याची तक्रार दिली. पोलिसांनी बाका सहारेवर अपहरणाचा गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे.

वीजबिलाचा गोंधळ; ३२ टक्केच ग्राहकांनी भरले वीजबिल

नागपूर: जून महिन्यात भरमसाठ वीजबिल ग्राहकांना पाठवल्यानंतर निर्माण झालेला असंतोष कमी करण्यासाठी महावितरणने वीजग्राहकांना टप्प्याटप्प्याने वीज बिल भरण्याची सोय उपलब्ध करून दिली. इतकेच नव्हे तर पाठवण्यात आलेली वीज बिल योग्यच असल्याचेही पटवून दिले. मात्र, त्यानंतरही नागपूर परिमंडळातील केवळ ३२ टक्केच वीजग्राहकांनी पूर्ण वीज बिल भरल्याचे पुढे आले आहे.

लॉकडाउनच्या काळात तब्बल तीन महिने वीजग्राहकांना सरासरी वीज बिले पाठवण्यात आली. लॉकडाउन शिथिल झाल्यानंतर महावितरणने पुन्हा मीटर रीडिंग घेणे सुरू केले, त्यानंतर छापील वीजबिलही पाठवण्यात आली. मात्र, जून महिन्यात पाठवण्यात आलेले वीजबिल भरमसाठ आल्याने नागरिकांना शॉक बसला. पण, महावितरणने पाठवण्यात आलेली वीजबिल योग्य असल्याचे पटवून देण्याचा प्रयत्न केला. पण यामुळे ग्राहकांचे फारसे समाधान झाले नाही. या वाढीव बिलांबद्दल असंतोष कायम आहे. यावर पर्याय म्हणून वीज बिल टप्प्याटप्प्याने भरण्याचा पर्यायही वीजग्राहकांना उपलब्ध करून दिला. मात्र, यालाही फारसा प्रतिसाद मिळालेला दिसत नसल्याचे पुढे आले आहे. त्यामुळे वीज बिल भरण्याला कंपनीने ८ जुलैपर्यंत मुदतवाढ दिली आहे.

याबाबत महावितरणच्या जनसंपर्क अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता, नागपूर परिमंडळात १३.९५ लाख वीजग्राहक आहेत. मात्र, यापैकी केवळ ४.४४ लाख वीजग्राहकांनी बिल भरले असून, यातील २.८७ लाख ग्राहकांनी १५ जूनपर्यंत वीज बिल भरले असल्याचे सांगितले. दरम्यान, एकरकमी म्हणजे एकाच वेळी पूर्ण बिल भरणाऱ्या ग्राहकांची संख्या किती, याची माहिती कंपनीकडून देण्यात आली नाही. यावर केवळ १४३ कोटी रुपयांचा वीज बिल भरणा करण्यात आला असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. अजूनही मोठ्या संख्येने वीजग्राहकांनी वीजबिल भरले नसले तरी कंपनीकडून करण्यात आलेल्या आवाहनाला वीजग्राहकांनी प्रतिसाद दिल्याचे कंपनीने म्हटले आहे.

भाजप शहराध्यक्ष प्रवीण दटके यांच्या मतानुसार, महावितरणने आवाहन केल्यानंतरही आतापर्यंत केवळ ३२ टक्केच वीजग्राहकांनी वीज बिल भरणे म्हणजे अजूनही ग्राहकांमध्ये वीजबिलांबाबत शंका आहे. याचा अर्थ वीजग्राहकांचा कंपनी व राज्य सरकारवरील विश्वास उडाला आहे. आतापर्यंत वीजग्राहक नियमितपणे वीजबिल भरत होते. मात्र, जून महिन्यात वाढीव बिल आल्यानंतरच ग्राहकांनी ती भरलेली नाहीत. महावितरण जोपर्यंत वाढीव बिल मागे घेऊन नवी बिले पाठवत नाहीत तोपर्यंत वीजग्राहक वीज बिल भरणार नसल्याचेही दटके यांनी स्पष्ट केले. दुसरीकडे महावितरणच्या एका सेवानिवृत्त अधिकाऱ्याच्या मते महावितरणने मीटर रीडिंग न घेण्याचा निर्णय चांगलाच चुकीचा ठरला आहे. करोनामुळे कंपनीने मार्च, एप्रिल आणि मे महिन्यातील मीटर रीडिंग घेतले नाही. मीटर रीडिंग घेणारी व्यक्ती सहसा कोणाच्याच सहवासात येत नाही. त्यामुळे महावितरणने रीडिंग घेतले असते तर सध्या उद्भवलेली स्थिती निर्माण झाली नसती. त्यामुळे याचा आर्थिक फटका महावितरणला बसण्याची शक्यता असल्याचेही त्यांनी सांगितले.

रुचिताला एक दिवसाचा पीसीआर

* ३ ठिकाणांवर पोलिसांची छापेमारी

नागपूर. प्रॉपर्टीवर अवैध कब्जा करणे, फसवणूक आणि खंडणीच्या प्रकरणांमध्ये फरार शिवसेनेचा बरखास्त शहर प्रमुख मंगेश कढव अद्याप पोलिसांना गवसलेला नाही. पोलिसांनी सोमवारी त्याची पत्नी रुचिता कढवला अटक केली होती. मंगळवारी रुचिताला न्यायालयात हजर करण्यात आले. पोलिस आणि सरकारी वकिलांच्या मजबूत युक्तिवादानंतर न्यायालयाने तिची एक दिवसाच्या पोलिस कोठडीत रवानगी केली. माहिती मिळाली आहे की, मंगळवारी पोलिसांनी ३ ठिकाणांवर छापेमारी केली, मात्र कढव सापडला नाही.

कढवविरुद्ध सक्करदरा, हुडकेश्वर, बजाजनगर, सीताबर्डी आणि अंबाझरी ठाण्यात ५ गुन्हे नोंद झाले आहेत. सक्करदरा आणि हुडकेश्वरमध्ये नोंद प्रकरणांमध्ये रुचिताही आरोपी आहे. सध्या हुडकेश्वरच्या प्रकरणात पोलिसांनी तिला अटक केली. मंगळवारी दुपारी पोलिसांनी रुचिताला न्यायालयात हजर केले. मंगेशबाबत विचारपूस करणे, प्रकरणाशी संबंधित दस्तावेज जप्त करणे, पैशांचा शोध लावणे आणि फरार असताना मंगेशने किती वेळा रुचिताशी संपर्क केला आदींची चौकशी करण्यासाठी पोलिस कोठडीची मागणी करण्यात आली. बचावपक्षाने पोलिस कोठडीला विरोध करीत खोट्या प्रकरणात अडकविल्याचे सांगितले. न्यायालयाने दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर रुचिताला एक दिवसाच्या पोलिस कोठडीत पाठविले. पोलिस अधिकाऱ्यांनुसार, जर पीसीआर समोर नाही वाढला तर रुचिताला सक्करदरा ठाण्यात नोंद प्रकरणात अटक करण्यात येईल. मंगळवारी एका पथकाने गुप्त माहितीवरून भंडारामध्ये छापेमारी केली. कढवचे ३ नातेवाईक भंडाऱ्यात राहतात. तिघांच्याही घरांची पोलिसांनी झडती घेतली, मात्र कढव सापडला नाही. सांगण्यात येते की, व्हाट्सअॅप कॉलिंगवर कढव सतत रुचिताच्या संपर्कात होता. तो आपल्या नातेवाईकांचा फोन वापरत आहे. लवकरच या प्रकरणात इतर लोकांवरही फास आवळण्यात येईल.